# * काही राज्यांसाठी विशेष तरतुदी *

भाग - २१ - कलम ३७१ ते कलम ३७१ जे ⇒ १२ राज्यांसाठी विशेष तरतुदी.

**उद्देश** ⟶
* मागास क्षेत्रातील जनतेच्या आकांक्षा पूर्ण करणे.
* आदिवासी लोकांच्या आर्थिक व सांस्कृ. हितांचे रक्षण.
* कायदा सुव्यवस्थेची बिघडलेली परिस्थिती हाताळणे.
* स्थानिक लोकांच्या हितांचे रक्षण.

## महाराष्ट्र आणि गुजरात - कलम ३७१

① महाराष्ट्र आणि गुजरातच्या राज्यपालांना खालील बाबतीत विशेष जबाबदारी.
* विदर्भ, मराठवाडा, आणि उर्वरित महाराष्ट्र
* सौराष्ट्र, कच्छ, आणि उर्वरित गुजरात

} स्वतंत्र वैधानिक मंडळाची स्थापना करणे.

② अहवाल दरवर्षी राज्य विधिमंडळासमोर

③ विकास खर्चाच्या निधीचे न्याय्य वाटप.

④ तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण पुरेशा संधींच्या तसेच रोजगारांच्या पुरेशा संधींच्या न्याय्य व्यवस्थेची तरतुद करणे.

## नागालँडसाठी कलम ३७१ - ए.

* राज्य विधानसभेने संमत केल्याशिवाय खालील बाबतीत संसदेचे कायदे नागालँडला लागू होणार नाही.
① नागा लोकांच्या धार्मिक किंवा सामाजिक पद्धती.
② त्यांचे परंपरागत कायदे आणि प्रणाली.
③ परंपरागत कायद्यानुसार दिलेल्या दिवाणी व फौजदारी न्यायनिवाड्याचे प्रशासन.
④ भूमी आणि भूमी संसाधन यांचे स्वामित्व व हस्तांतरण.

* बंडखोर नागांमुळे अंतर्गत अशांतता निर्माण झाल्यास कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी राज्यपालांवर - मंत्रिमंडळाशी विचारविनिमय करून निर्णय.

* केंद्राने विशिष्ट उद्दिष्टासाठी उपलब्ध करून दिलेला निधी त्याच कारणासाठी.

* तुएनसंग जिल्ह्यासाठी ३५ सदस्यांची प्रादेशिक परिषद. त्यानुसार स्थापनेपासून १० वर्षे
i) राज्यपाल जिल्ह्याचे प्रशासन
ii) केंद्राने दिलेल्या निधीचे तो राज्य व तुएनसंग साठी वाटप करेल.
iii) प्रादेशिक परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यपाल आदेश देईपर्यंत विधिमंडळाचा कोणताही कायदा जिल्ह्याला लागू होणार नाही.
iv) राज्यपाल शांतता सुव्यवस्थेसाठी संसदेच्या किंवा इतर कायद्यात दुरुस्ती

कायदा करू शकतो.

* मंत्रिमंडळामध्ये जिल्ह्याच्या कामकाजासाठी मंत्री ⇒ त्या जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व करणारा.
* त्या जिल्ह्यातील विधानसभेतील सदस्य लोकांनी निवडून दिलेला नसतो तर क्षेत्रीय परिषदेने निवडलेला असतो.

## * आसाम आणि मणिपूर *

आसाम - ३७१ बी व मणिपूर - ३७१ सी.

आसाम ⇒ राष्ट्रपतीला आदिवासी क्षेत्रातून निवडून आलेला सदस्य व जो ठरवील तो सदस्य यांची आसाम विधानसभेची समिती स्थापन करण्याचा अधिकार

## * मणिपूर *

① राज्याच्या पर्वतीय क्षेत्रातून निवडून आलेल्या सदस्यांची - राष्ट्रपती - मणिपूर विधानसभा समिती.
② त्या समितीच्या कामकाजाची जबाबदारी - राज्यपालाकडे.
③ राज्यपाल त्याचा अहवाल दरवर्षी राष्ट्रपतीला सादर करतो.
④ त्या क्षेत्राच्या प्रशासनासंबंधी केंद्र सरकार राज्य सरकारला आदेश देऊ शकतो.

## * आंध्र प्रदेश व तेलंगणा *

कलम ३७१ डी व कलम ३७१ इ - आंध्र प्र.
कलम ३७१ डी - तेलंगणाला लागू ⇒ २०१४ आंध्र प्र पुनर्रचना अधिनियम २०१४

३७१ डी मधील तरतुदी :

① सार्व.नोकऱ्या व शिक्षण - न्याय्य संधीची तरतूद - राष्ट्रपतीला अधिकार.
② शैक्षणिक संस्था तसेच स्थानिक सेवांमध्ये स्थानिकांना प्राधान्य.
③ राज्यातील नागरी पदांसंदर्भात तक्रारी व विवाद टाळण्यासाठी प्रशासकीय न्यायाधिकरण स्थापन करण्याचा राष्ट्रपतीचा अधिकार - हे न्यायाधिकरण राज्याच्या उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्राबाहेर - (फक्त सर्वोच्च न्यायालय अधिकारक्षेत्र)
( आंध्र प्र. प्रशासकीय न्यायाधिकरण आदेश - १९७५

३७१-इ
- ① आंध्र प्र राज्यात केंद्रीय विद्यापीठ स्थापन करण्याचे संसदेला अधिकार.

## * सिक्कीम *

३७१ - एफ - सिक्कीमसाठी.

① विधानसभेत ३० पेक्षा कमी सदस्य नसतील
② लोकसभेत १ जागा.
③ विकासासाठी - न्याय्य व्यवस्थेचा अधिकार - राज्यपाल.
④ राष्ट्रपती इतर राज्याला लागू असलेला कायदा सिक्कीमला लागू करू शकतो.
(काही बदल करून किंवा बंधने घालून)

Scanned by CamScanner

## * मिझोराम *

कलम ३७१-जी.

* राज्य विधिमंडळाने ठरविल्याशिवाय खालील बाबतीत संसदेचे कायदे लागू होणार नाहीत.
  ① धार्मिक / सामाजिक पद्धती
  ② पारंपारिक कायदे / प्रणाली.
  ③ या कायद्याप्रमाणे दिवाणी / फौजदारी न्यायनिवाड्याचे प्रशासन.
  ④ जमीनीचे स्वामित्व आणि हस्तांतरण.
* विधानसभेत ४० पेक्षा कमी सदस्य नसतील.

## * अरुणाचल प्र. आणि गोवा *

कलम ३७१-एच — अरुणाचल प्र.
① शांतता सुव्यवस्था → राज्यपालांची जबाबदारी.
② विधानसभेत ३० पेक्षा कमी सदस्य नसतील.

कलम ३७१-आय - गोवा.
① विधानसभेत ३० पेक्षा कमी सदस्य नसतील.

## * कर्नाटक *

→ ९८वी घ.दु. २०१२ अन्वये समाविष्ट

कलम ३७१-जे - राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपविण्याचे राष्ट्रपतींस अधिकार.
① हैदराबाद-कर्नाटक क्षेत्रासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करणे.
② राज्य विधानसभेला त्याचा दरवर्षी अहवाल.
③ विकास खर्चाच्या निधीचे वाटप.
④ शैक्षणिक / व्यावसायिक संस्था - विभागवार आरक्षित जागा.
⑤ शासनाच्या पदामध्ये स्थानिकांना आरक्षण.

Scanned by CamScanner